# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 12/03/2021 (शुक्रवार)

(सकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 10 कि.मी अंतरावर झिलबोडी येथे दिनांक 11/03/2021 चे 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. रेखा अमित गावंडे, वय 35 वर्षे, रा. झिलबोडी ता. भिवापुर जि. नागपुर ही पती अमित गावंडे, वय 40 वर्षे यांच्यासह राहत असुन शेजारी राहणारे चुलत सासरे व त्यांचे 2 मुले हे आरोपी नामे– 1) काशीनाथ भयाराम गावंडे, 2) सांरग काशीनाथ गावंडे, वय 30 वर्ष, 3) रंजित काशीनाथ गावंडे, वय 35 वर्ष, सर्व रा. झिलबोडी ता. भिवापुर जि. नागपुर यांच्यासोबत एकत्र राहत असून त्यांचे इलेक्ट्रीक मिटर एकच आहे. त्यांच्यात विज बिलाचे पैसे भरण्याचे कारणावरून दि. 10/03/2021 चे 18.00 वा. वाद विवाद करून फिर्यादीची इलेक्ट्रीक लाईट कापुन बंद केली होती. फिर्यादीचे पती यांनी "आमची लाईन का कापली" असे हटकले असता, आरोपीतांनी संगनमत करून, फिर्यादीच्या पतीचा गळा दाबुन खाली पाडले व काठीने डोक्यावर मारून गंभीर जखमी करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. यानंतर आ.क्र. 3 याने त्यांचे पायावर, मांडीवर हातावर मारहाण करून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 307, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. भस्मे 9764946808 हे करीत आहे.

### घरफोडी

पो.स्टे. पारशिवनी:– अंतर्गत 09 कि.मी अंतरावर मौजा मेहंदी येथे दिनांक 10/03/2021 ते दिनांक 11/03/2021 चे 22.30 वा. ते 02.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अनिल गणपती बिहुने, वय 48 वर्ष, रा. मेंहदी ता. पारशिवनी यांचे घराचे दाराचे अज्ञात आरोपीने कुंडी काढुन घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने अलमारीचे लॉकरमध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागीने कि. 54,5000/रू चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीख शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. उबाळे 7498179174 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर